सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
॥ यः क्रियावान् स पण्डितः ॥

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## ( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

# वित्त व लेखा विभाग

**रु. २ लाख स्वतंत्र वैद्यकीय विमा योजनेसाठी संमती व धनादेश सादर करण्याच्या अंतिम दिनांकात वाढ बाबत..**

**परिपत्रक क्र.   / २०२५**

रु. २ लाखांची स्वतंत्र वैद्यकीय विमा योजना (स्वखर्चाने) घेण्याबाबत यापूर्वी निर्गमित करण्यात आलेल्या परिपत्रकानुसार (परिपत्रक क्र. ३१२/२०२५ दि. ०९ डिसेंबर २०२५), संबंधित विद्यापीठ सेवकांकडून संमतीपत्र व विमा हप्त्याचा धनादेश सादर करण्याची अंतिम दिनांक **दि. १५ डिसेंबर २०२५** निश्चित करण्यात आलेली होती.

तथापि, विद्यापीठ सेवकांच्या सोयीसाठी आणि प्रशासकीय कारणास्तव, **रु. २ लाख स्वतंत्र वैद्यकीय विमा योजनेसाठी संमतीपत्र व धनादेश सादर करण्याची अंतिम दिनांक वाढवून दि. २२ डिसेंबर २०२५ (सोमवार)** पर्यंत करण्यात येत आहे.

उर्वरित सर्व अटी, शर्ती, प्रक्रिया, विमा हप्त्याची रक्कम, पात्रता निकष, तसेच HR प्रणालीतील संमती नोंदविण्याची पद्धत **यापूर्वी जारी केलेल्या परिपत्रकानुसारच लागू राहतील**. या संदर्भातील इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही. विद्यापीठ सेवकांनी कृपया वाढीव अंतिम दिनांकाची नोंद घ्यावी व विहित कालावधीत आवश्यक ती प्रक्रिया पूर्ण करावी.

**महत्त्वाची सूचना :**

दि. **२२ डिसेंबर २०२५** नंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही संमतीपत्रांचा व धनादेशांचा विचार केला जाणार नाही, याची सर्व संबंधित विद्यापीठ सेवकांनी नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे - ४११००७.
जा.क्र. वित्त/२०२५-२६/६८२
दिनांक : १५ डिसेंबर, २०२५

**(सीएमए (डॉ.) चारुशीला गायके)**
**वित्त व लेखा अधिकारी**

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :

१. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग,
२. मा. संचालक, सर्व प्रशाला.
३. मा.शाखाप्रमुख,सर्व प्रशासकीय शाखा,

सदर परिपत्रकामधील आशय आपल्या विभागामधील सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा, ही विनंती.